मायमराठी वृत्तपत्र
साप्ताहिक

# सायबर धोक्यांपासून बचावासाठी विद्यार्थिनींना डिजिटल सुरक्षेचे धडे

▪ पुणे (प्रतिनिधी)
सा. मायमराठी वृत्तपत्र ✓

डिजिटल युगातील वाढत्या सायबर गुन्ह्यांच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थिनींमध्ये सुरक्षित इंटरनेट वापराबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी क्विक हील फाउंडेशनच्या 'सायबर शिक्षण फॉर सायबर सुरक्षा २०२६' उपक्रमांतर्गत हडपसरमधील साधना कन्या विद्यालयामध्ये सायबर जनजागृती अभियान उत्साहात पार पडले.

अण्णासाहेब मगर महाविद्यालयाच्या सायबर वॉरियर्स यांनी ऑनलाइन फसवणूक, मजबूत पासवर्ड, सोशल मीडियाचा सुरक्षित वापर, डिजिटल गोपनीयता, संशयास्पद लिंक, बनावट संदेश, ओटीपी व आर्थिक फसवणुकीपासून बचाव याबाबत विद्यार्थिनींना प्रात्यक्षिकांसह मार्गदर्शन केले. विद्यार्थिनींनी उत्स्फूर्त सहभाग घेत विविध प्रश्न विचारून शंकांचे निरसन करून घेतले.

याप्रसंगी प्राचार्य ए. के. करे, पर्यवेक्षक डी. ए. कोळेकर, टी. यू. पाटील, पी. एन. सावंत, रयत शिक्षण संस्थेचे आजीव सदस्य लालासाहेब खलाटे, आजीव सेवक तुकाराम डोंगरे उपस्थित होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नितीन घोरपडे, उपप्राचार्य प्रशांत मुळे, उपप्राचार्या शुभांगी औटी, विभागप्रमुख विलास वाणी व प्रा. मनिषा गाडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम यशस्वीपणे पार पडला.